-६७-

कुक्कुटपालनासाठी वापरल्या जाणाऱ्या शेत जमिनीवर अकृषिक आकारणीबाबत व परवानगीबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. अेनअे १०८९/४८२३/[१९] ल-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ जानेवारी, १९९१

वाचा :

१] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एनएए ३४८४/२६२९/ सीआर-६१/ल-२, दिनांक २८-२-१९८६.
२] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एनएए-१०८८/२७७८८/ [९५] ल-२, दिनांक ८-११-१९८८.
३] शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. अेनअेपी १०८९/४८२३/ [१९] ल-२, दिनांक १०-९-१९९०.
४] शासन पत्र, महसूल व वन विभाग क्र. एस ३०/९०/२२४३/ [७८६] ल-२, दिनांक २३-११-१९९०.

शासन निर्णय :

महाराष्ट्र राज्यात कुक्कुट पालनाला चालना मिळावी या दृष्टीने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे :

"कुक्कुटपालनासाठी वापरण्यांत येणारी जमीन ही बिगर शेती जमीन न समजता शेतीसाठी वापरलेली जमीन म्हणूनच समजण्यात येईल. त्यावर बिगर शेती आकार [नॉन ॲग्रिकल्चरल असेसमेंट] बसविण्यात येणार नाही."

२. सदरहू शासन निर्णयाच्या प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या आदेशांत सुधारणा करण्यासाठी व कुक्कुटपालनाच्या व्यवसायासाठी अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही असा लोक प्रतिनिधींनी आग्रह धरल्यामुळे आणि कुक्कुटपालन व्यवसायाला चालना मिळावी त्याचप्रमाणे कुक्कुटपालन व्यवसायातील अडवणी दूर व्हाव्यात म्हणून प्रस्तावनेतील उपरोक्त शासन आदेश सुधारण्याचा प्रश्न शासनाच्या दिर्घकाळ विचाराधीन होता. शासनाने याबाबतीत सखोल अभ्यास करून पुढील परिच्छेद ३ मध्ये दिल्याप्रमाणे सदरहू शासन निर्णयाच्या प्रस्तावातील १ ते ४ येथे उल्लेख केलेल्या सर्व आदेशात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

३. सदरहू शासन निर्णयाच्या दिनांकापासून महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका आणि नगर परिषदा यांचे क्षेत्र सोडून उर्वरित सर्व क्षेत्रात कुक्कुटपालन व्यवसायासाठी वापरावयाच्या शेत जमिनींना अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही.

४. सदरहू शासन निर्णय, नगरविकास विभाग, कृषि व पदुम विभाग आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र. १०१६/व्यय-९, दिनांक २८-१२-१९९० नुसार सहमती नंतर निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ ग. ह. पाटील ]

अवर सचिव,
महसूल व वन विभाग